BEFORE THE NATIONAL GREEN TRIBUNAL
WESTERN ZONE BENCH, PUNE
ORIGINAL APPLICATION NO. 89 OF 2023

IN THE MATTER OF:

Ravindra Kuber Walwade ............................................Applicant

V/S

Govt. Medical College and Hospital and others ..........Respondent

ADDITIONAL REPLY AFFIDAVIT ON BEHALF OF RESPONDENT No. 1

I, Dr. Sandeep Bapuso Satpute, aged 48 years, occupation – Government Service working as Assistant Professor, Department of Biochemistry, Government Medical College Miraj having my office at Pandharpur Road Miraj District Sangli – 410410, I am filing this affidavit on behalf of the Respondent No. 1 (Dean, Government Medical College Miraj), do hereby solemnly affirm state as under:

I am working as Assistant Professor, Department of Biochemistry, Government Medical College Miraj with effect from April 2003, I am well conversed with the facts and circumstances of the case as well as the record of the case lying in my office, I am filling this Affidavit only with a limited purpose of bringing on record true facts of the case as under.

1. I say and submit that the Chief Engineer, Maharashtra Jeevan Pradhikaran Pune Division, Pune has approved the tender process and the work was allotted to Aryan Agro Business and Infra Projects LLP Navi Mumbai vide letter no. 776/25 dated 28.03.2025. The letter is enclosed herewith as **Annexure R-1**.

2. The Executive Engineer, Maharashtra Jeevan Pradhikaran Sangli has asked the Aryan Agro Business and Infra Projects LLP Navi Mumbai to deposit security deposit and provide stamp paper vide letter no, 621/25 dated 28.03.2025. The letter is enclosed herewith as **Annexure R-2**.

3. The Executive Engineer, Maharashtra Jeevan Pradhikaran Sangli has provided work-order to Aryan Agro Business and Infra Projects LLP Navi Mumbai vide letter no. 637/2025 dated 31.03.2025. The letter is enclosed herewith as **Annexure R-3**.



Noted & Registered
Serial Number
6267/2025
- 9 APR 2025

NOTARY
Adv. M. D. PATIL
SANGLI (MAH)
Reg. No. 5289
Exp. Dt. 31/1/2028
GOVT. OF INDIA

4. The Contractor (Aryan Agro Business and Infra Projects LLP Navi Mumbai) has started the preliminary work on 05 April 2025. The preliminary work includes cleaning of the land, removing dried grass and bushes and marking of sketch of the proposed work. The photographs of the said preliminary works are enclosed (1 to 4 in number) herewith as **Annexure R-4**.

Above supplementary reply is submitted to honourable tribunal for information.

Solemnly affirmed on the day 9, April 2025.

Identified by

asBrahme
Arundhati S. Brahme
A.G.P., Pune

For and on behalf of Respondent No. 1

(Dr. Sandeep Bapuso Satpute)
Assistant Professor, Dept. of Biochemistry
Government Medical College and Hospital
Miraj

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

NOTARY
Adv. M. S. PATIL
SANGLI (MAH)
Reg. No. 5289
Exp. Dt. 31/1/2028
GOVT. OF INDIA

# VERIFICATION

I, Dr. Sandeep Bapuso Satpute, aged 48 years, occupation – Government Service working as Assistant Professor, Department of Biochemistry, Government Medical College Miraj having my office at Pandharpur Road Miraj District Sangli – 410410 do hereby state on solemn affirmation what is stated in the forgoing affidavit in reply to my own knowledge and I believe the same to be true and correct.

Solemnly affirmed on the day ..9.., April 2025.

For and on behalf of Respondent No. 1

(Dr. Sandeep Bapuso Satpute)
Assistant Professor, Dept. of Biochemistry
Government Medical College and Hospital
Miraj

Solemnly affirmed before me by
Shri. Dr. Sandeep Bapuso Satpute
Who is identified before me by
Shri. Anandah S. Boralkar Adv.
Whom I personally Known.

BEFORE ME

Adv. MARUTI S. PATIL
NOTARY REG. NO. 5289
GOVT. OF INDIA
"VAISHNAVI APPT", F-2, BRAHMANPURI
MIRAJ - 416410. MO. 9422613749
NOTARY EXP DT. 31/1/2028

NOTARY GOVT. OF INDIA
Adv. M. S. PATIL
SANGLI MAH.
Reg. No. 5289
Exp. Dt. 31/1/2028

Annexure R-1



महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मुख्य अभियंता, पुणे प्रादेशिक विभाग पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे लष्कर पा.पु. केंद्र आवार,
४६३ स्टेव्हली रोड, सेंट मेरी चर्च शेजारी, कॅंप, पुणे - ४११००१
दूरध्वनी : कार्यालयीन २६३५००६२ / २९७०६०६४
Email : cemjppn@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

जा.क्र.: मु.अ.(पु)/तांशा-३/पूर्ण ठेव/मिरज/ शा.वै.म.व रु/भू.ग.यो/नि.स्वि.प्र./ ७७६ /२०२५ दि२८मार्च २०२५

प्रति,

अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मंडळ,सांगली

**विषय :** पूर्ण ठेव तत्वावर - मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व निवासी संकुल येथे भुयारी गटार योजना करणे
निविदा स्विकृतीबाबत.

**संदर्भ :** १) या कार्यालयाचे डॉकेट जा.क्र २०८ दि २९/१/२०२५
२) मा सदस्य सचिव, मजीप्रा, मुंबई यांना सादर आणि मान्यता - टिप्पणी दि. १४/२/२०२५ आणि कार्यक्रम बाब क्र १
३) म.जी.प्रा. निविदा समितीची १७४ वी बैठक दि. १८/३/२०२५
४) मा सदस्य सचिव कार्यालयाची मान्य टिप्पणी दि २४/३/२०२५

पूर्ण ठेव तत्वावर - मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व निवासी संकुल येथे भुयारी गटार योजना करणे या कामाचा निविदा स्विकृती प्रस्ताव डॉकेट स्वरूपात संदर्भ क्र १ अन्वये मुख्यालयास सादर करण्यात आला होता. मुख्यालयाने सदर प्रस्ताव संदर्भ क्र २ अन्वये निविदा समितीस सादर केला होता. निविदा स्विकृती समितीने खालील अटींच्या अधीन राहून निविदा स्विकृती प्रस्तावास मान्यता प्रदान केली आहे. सदर बाबत संदर्भ क्र ४ अन्वये कळविण्यात आले आहे.

१) स्विकृत निविदेचा आर्थिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| ठेकेदाराचे नांव | निविदेची किंमत मजीप्रा दरसूची सन २०२३-२४ व सा बां सन २०२२-२३ | देकाराची टक्केवारी व किंमत | निविदेतील कामांची चालू दरसूची मजीप्रा सन २०२३ - २४ व सा. बां. सन २०२२ - २३ यानुसार एकूण मुल्यांकित किंमत व देकाराची तुलनात्मक टक्केवारी |
|---|---|---|---|
| आर्यन ॲग्रो बिझनेस अँड इन्फ्रा प्रोजेक्टस एल एल पी नवी मुंबई | रु १०,३७,८६,५००/- | At Par दराने रु १०,३७,८६,५००/- | रु १०,३७,८६,५००/- At Par |

२. योजनेच्या प्रशासकीय तसेच तांत्रिक मंजुरीतील अटींचे पालन करण्यात यावे.

३. प्राप्त निधीनुसार कामे हाती घेण्यात यावी.

४. योजनेवर मंजूर किंमतीपेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

५. सदरचे काम हे मजीप्रामार्फत पूर्ण ठेव तत्वावर करण्यात येणार असल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज, जि. सांगली यांचेकडून आवश्यक निधी प्राप्त करून घेण्याची जबाबदारी अधीक्षक अभियंता, सांगली आणि कार्यकारी अभियंता सांगली यांची राहील.

६. सदरचे काम हे मजीप्रामार्फत पूर्ण ठेव तत्वावर करण्यात येणार असल्याने मजीप्राच्या प्रचलित धोरणानुसार संबंधित यंत्रणेसोबत आवश्यक करारनामा करण्यात यावा.

७. ETP (१७.५ %) प्राप्त करून घेण्यात यावे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही तातडीने करावी.

वैशाली आवटे

(वैशाली आवटे)

मुख्य अभियंता (प्र)

प्रत : कार्यकारी अभियंता, मजीप्रा - सांगली - माहीती आणि कार्यवाहीसाठी

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,सांगली**

'जलभवन,' गेस्ट हाऊस नजीक,दक्षिण शिवाजी नगर,

सांगली-४१६४१६

कार्यालय(०२३३)२३२२८८४

Email-mjpsanglidn@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. लेखानिविदा/ शावैममि/ भुगयो / पुर्ण ठेव / निस्विप्र/ ६२१ /२०२५ दिनांकः २८/०३/२०२५

प्रति,

आर्यन आग्रो बिझनेस अँड इन्फ्रा प्रोजेक्टस लि.

प्रेमा फॅशन मॅक्स बिल्डिंग,

प्लॉट नं अे - ५९६, टीटीसी इंडस्ट्रियल

एमआयडीसी, म्हापे

नवी मुंबई ४०० ०७१

**विषय :-** मिरज शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व निवासी संकुल भुयारी गटार योजना राबविणे बाबत - **पुर्ण ठेव काम**
**निविदा स्विकृतीसाठी कागदपत्रांची पुर्तता करणे बाबत**

**संदर्भः** - १. या कार्यालयाची दुबार निविदा सुचना क्र. ०४ सन २०२४-२५
२. मा. मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादेशिक विभाग पुणे यांचे पत्र क्र. मु.अ.(पु)/तांशा-३/ पूर्ण ठेव / मिरज / शा.वै.म.व रु./भु.ग.यो./ नि.स्वि.प्र./ ७७६ दि. २८/०३/२०२५

विषयात नमुद केलेल्या कामाच्या निविदेस संदर्भ क्र. २ अन्वये मंजुरी प्राप्त झाली असुन सदर निविदा अंदाजित किंमतीने म्हणजे रु. १०,३७,८६,५००/- ने स्वीकृत करणेत येत असल्याने खालील कागदपत्रांची पुर्तता दि. ०७/०४/२०२५ पुर्वी करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

१. प्राथमिक सुरक्षा ठेव पोटी निविदा अटी व शर्ती नुसार निविदा स्विकृती रक्कमेच्या २% राष्ट्रीयकृत / शेड्युलल्ड बँक हमी पत्र / मुदत ठेव पावती रक्कम रु. २०,७५,७३०/- (अक्षरी रु. वीस लाख पंच्याहत्तर हजार सातशे तीस मात्र).
२. मुद्रांक शुल्क रु. १,०३,३००/- (अक्षरी रु. एक लाख तीन हजार तीनशे मात्र) भरणा करुन चलनाची / ESBTR प्रत या कार्यालयास सादर करावी.
३. करार करणेकरीता रु. ५००/- कोरा स्टँम्प पेपर.

तरी, वरील कागदपत्रांची पुर्तता उपरोक्त तारखेपर्यंत या कार्यालयाकडे सादर करावीत हि विनंती.

**सोबतः** काही नाही.

(अजित आडे)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,
सांगली

**प्रतः-** अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज.
२/- विषयांकित कामाची निविदा स्विकृती करणेत येत असल्याने मंजुर रक्कम या कार्यालयाकडे तात्कळ वर्ग करणेत यावी.

Annexure R-3

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,सांगली**
'जलभवन,' गेस्ट हाऊस नजीक,दक्षिण शिवाजी नगर,
सांगली-४१६४१६
कार्यालय(०२३३)२३२२८८४
Email-mjpsanglidn@gmail.com

जा.क्र. लेखानिविदा/ शावैममि/ भुगयो / पुर्ण ठेव / का. आ./ ६३६ /२०२५ दिनांक: ३१ / ०३ /२०२५

प्रति,
आर्यन आग्रो बिझनेस अँड इन्फ्रा प्रोजेक्टस लि.
प्रेमा फॅशन मॅक्स बिल्डिंग,
प्लॉट नं अे - ५९६, टीटीसी इंडस्ट्रियल
एमआयडीसी, म्हापे
नवी मुंबई ४०० ०७१

**विषय :-** मिरज शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व निवासी संकुल भुयारी गटार योजना राबविणे बाबत - **पुर्ण ठेव काम**
**कार्यारंभ आदेश**

**संदर्भः -** १. मा. मुख्य अभियंता, मजीप्रा प्रा. वि. पुणे यांचे पत्र क्र. मु.अ.(पुणे)/तांशा-३/शा.वै म व रु. मिरज/UGD/FD Work/परवानगी/ ५४३ दि. ११/०३/२०२४
२. मा. मुख्य अभियंता, मजीप्रा प्रा. वि. पुणे यांचे पत्र क्र. मु.अ.(पुणे)/तांशा-३/वै. म आणि रु मिरज/ फेर तां मं/ ७३६ दि. २८/०३/२०२४
३. महाराष्ट्र शासन, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचा शासन निर्णय क्र. जीसीएम-२०२२/ प्र.क्र.३६९/प्रशा-१ दि. २१/०८/२०२४
४. मा. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज यांचे पत्र क्र. शावैमरुमि/ बांधकाम/ कि/ ६७८०-८४ दि. २७/०८/२०२४
५. या कार्यालयाची दुबार ई निविदा सुचना क्र. ०४ सन २०२४ -२५
६. मा. मुख्य अभियंता, मजीप्रा प्रा. वि. पुणे यांचे पत्र क्र. मु.अ.(पु)/तांशा-३/ पुर्ण ठेव/ मिरज/ शा.वै.म.व.रु/भू.ग.यो./नि.स्वि.प्र./ ७७६ दि. २८/०३/२०२५
७. या कार्यालयाचे पत्र क्र. लेखानिविदा/शावैममि/भुगयो/ पुर्ण ठेव/निस्विप्र/ ६२१ दि. २८/०३/२०२५
८. आपले पत्र क्र. AABIPL/MJP/२०२४-२०२५/ ०३ दि.३१/०३/२०२५

ज्या अर्थी संदर्भ पत्र क्र. ६ अन्वये प्राप्त झालेल्या मंजूरीनुसार व संदर्भ पत्र क्र. ७ अन्वये कागदपत्रांच्या पुर्ततेबाबत विचारणा केले नुसार निविदा स्विकृतीसाठी आवश्यक असणारी प्राथमिक सुरक्षा ठेव स्वरुपात इंडियन बँक, शाखा घनसोली यांचे कडील मुदत ठेव पावती क्र. ०८४०७१९ रक्कम रु. २०,७५,७३०/- (अक्षरी रु. वीस लाख पंच्याहत्तर हजार सातशे तीस मात्र) ची दि. २९/०३/२०२७ पर्यंत वैध असणारी सादर केलेली आहे.

त्याअर्थी विषयात नमुद केलेल्या कामाची अंदाजीत किंमत सार्वजनिक बांधकाम विभाग यांची सन २०२२- २३ व मजीप्राची सन २०२३-२४ चालु दरसुची नुसार (जी. एस. टी. शिवाय) रु. १०,३७,८६,५००/- (अक्षरी रु. दहा कोटी सदतीस लाख शहाऐंशी हजार पाचशे मात्र) असुन, त्याची सार्वजनिक बांधकाम विभाग

यांची सन २०२२- २३ व मजीप्राची सन २०२३-२४ चालु दरसुची नुसार मुल्यांकित किंमत १०,३७,८६,५००/- (अक्षरी रु. दहा कोटी सदतीस लाख शहाऐंशी हजार पाचशे मात्र) इतकी आहे. आप सादर केलेला अंतिम सुधारीत देकार हा मुंल्यांकित किंमतीच्या व निविदा अंदाजित किंमतीइतका दराचा म्हणजे रु. १०,३७,८६,५००/- (अक्षरी रु. दहा कोटी सदतीस लाख शहाऐंशी हजार पाचशे मात्र) आहे.

सदरचा देकार सार्वजनिक बांधकाम नियमावली तसेच सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमीत केलेली परिपत्रके व प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजूरीची अटी व शर्तीच्या अधिन राहून सदरची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून स्विकृत करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

१) सदर कामावर होणारा खर्च प्रशासकिय मान्यतेच्या अधिन राहुन मर्यादीतच करण्याचा आहे.

२) सदर काम हे संदर्भ क्र. १ च्या मंजुरीनुसार पुर्ण ठेव तत्वावर मजीप्रा मार्फत राबविणेत येत आहे.

३) निविदेअंतर्गत कामे सुरु करण्यापूर्वी संपूर्ण कामाचा व कंत्राटी कामगारांचा विमा शासकीय विमा प्रतिनिधीकडे उतरवणे बंधनकारक राहील अन्यथा स्विकृत निविदा रकमेच्या १% प्रमाणे येणारी रक्कम प्रथम चालु देयकातून कपात करुन मजीप्रा मार्फत विमा उतरवण्याची कार्यवाही करण्यात येईल.

४) निविदेतील अटी व शर्तीनुसार कार्यारंभ आदेश पत्र मिळाल्यानंतर १० दिवसांच्या आत कामावरील कामगारांचे बॅक खाते क्रमांक व आधार कार्ड क्रमांक याची यादी सादर करणे बंधनकारक राहील.

५) चालू दरसूचीमधील अटी व शर्ती नुसार १२.५% ईपीएफ चा समावेश लेबर पोर्शनमध्ये असल्याने कामावरील कामगारांचा भविष्य निर्वाह निधी उतरवून यादी सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा दरपृथकरण करुन देयके अदा केली जातील.

६) कंत्राटी कामगार (नियम व निमुर्लन) अधिनियम १९७० चे तंतोतंत पालन करणे तसेच कामगारांना किमान वेतन देणे बंधनकारक राहील.

७) सदर निविदेच्या अनुषंगाने म.जी.प्रा. व आपले मार्फत विविध स्तरावर झालेला पत्र व्यवहार हा या निविदेचा एक भाग राहील.

८) सदरच्या निविदेमध्ये जादा परिमाणाचे म्हणजे खंड - ३८ साठी रु. १०,३७,८६,५००/- (अक्षरी रु. दहा कोटी सदतीस लाख शहाऐंशी हजार पाचशे मात्र) ही रक्कम ग्राह्य धरली जाईल.

९) निविदेचा कालावधी कामाच्या आदेशापासुन पावसाळयासह २४ महिने असा राहिल.

१०) सदरची निविदा जी.एस.टी. शिवाय मागणी करण्यात आलेली आहे. जी.एस.टी. परतावा योजनेचे चालु देयक अदा झाले नंतर आपलेमार्फत जी.एस.टी.अदा झालेल्या चलनाची प्रत सनदी लेखापाल यांचेकडुन प्रमाणित करुन घेऊन या कार्यालयास सादर केलेनंतर जी.एस.टी. परतावा अदा करण्यात येईल.

११) निविदा स्विकृतीसाठी प्राथमिक सुरक्षा ठेव / अतिरीक्त सुरक्षापोटी देण्यात आलेली बँक गॅरंटीची / ठेव पावतीची मुदत संपणेपुर्वी नुतनीकरण करुन देण्याची जबाबदारी आपल्यावर राहील. अन्यथा बँक गॅरंटीची रक्कम चालु देयकातुन वसुल करुन घेणेची कार्यवाही करणेत येईल.

१२) योजनेच्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेमधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१३) सदर काम हे पुर्ण ठेव तत्वावर असल्याने मा. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालय, मिरज यांचे कडुन रु. १४.५१ कोटी या कार्यालयाकडे वर्ग होणे गरजेचे आहे. वर्ग होणाऱ्या रक्कमेमधुन चालु देयक पारित झालेनंतर मध्यवर्ती कार्यालयाकडे निधी मागणी करुन निधी प्राप्त झालेनंतरच देयक अदायगी करणेत येईल. त्यास विलंब झालेस विभागीय कार्यालय जबाबदार असणार नाही.

१४) सदर निविदा स्विकृती आदेश प्राप्त झालेनंतर उपविभागीय अभियंता, मजीप्रा उपविभाग, सांगली व विद्युत कामासाठी उपविभागीय अधिकारी यांत्रिकी, विभागीय कार्यालय, सांगली यांच्या देखरेखे खाली निविदेतील उपांगाची सर्व कामे पूर्ण करण्याची आहेत.

१५) *सदर निविदा ही **बी.१/स.स. /सांगली / ०८ सन २०२४-२५** अशा क्रमांकाची म्हणून संबोधली जाईल.*

**सोबत:** निविदा प्रमाणित प्रत.

(अमित आडे)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,
सांगली

**प्रत:** मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे प्रादेशिक विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत:** मा. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत:** मा. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सादर.


**प्रत:** उपविभागीय अभियंता, मजीप्रा उपविभाग, सांगली यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**प्रत:** उपअभियंता (यां) विभागीय कार्यालय, सांगली यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.


**प्रत:** तांशा विभागीय कार्यालय, सांगली यांना माहितीसाठी.

**प्रत:** लेखा शाखा विभागीय कार्यालय, सांगली यांना माहितीसाठी.


<u>**Annexure R-4**</u>




Photograph 1




Photograph 2




Photograph 4




Photograph 4